PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES Vol 1, Issue 2

# ग्रामीण साहित्य चळवळ व ग्रामीण साहित्य : एक अभ्यास

**प्रा डॉ सविता माधवराव पवार**
**कला व विज्ञान महिला**
**महाविद्यालयए मेहकर.**
**महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना :–**

ग्रामीण साहित्याची चळवळ 1970 च्या सुमारास सुरू झाली. त्यापूर्वीही ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. आधुनिक ग्रामीण साहित्याचा जेव्हा आपण विचार करायला लागतो, त्याचा आरंभकाळ 1920 नंतरच्या काळापासून सुरू होतो. त्या काळात ग्रामीण साहित्य लिहिणारे लेखक हे पांढरपेक्षा वर्गातले होते. साहित्य हे प्रामुख्याने रंजनासाठी लिहायचे असते, असे समजण्याचा तो काळ होता. परंतु 1970 नंतर मात्र जे मी भोगले आहे, अनुभवले आहे, पाहिले आहे, त्याचे चित्रण ग्रामीण साहित्यातून होऊ लागले. साहित्याचा वास्तवाशी संबंध आला. ग्रामीण साहित्य चळवळ उभी करण्यामागे विशेषतः रा.रं. बोराडे, आनंद यादव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे आदी लेखक प्रमुख होते. एक नवा प्रवाह म्हणून मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याला स्थान मिळाले आहे. ग्रामीण साहित्य चळवळीमुळे ग्रामीण लेखकांना नवी दिशा मिळाली, लेखकाची एक नवी पिढी ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण करू लागली. मराठी समाजाचे सर्वांगीण दर्शन साहित्यातून घडावे, ही वाचकांची अपेक्षा दृढ झाली. मराठी भाषेतल्या अनेक बोलींना अभिव्यक्तीत स्थान प्राप्त झाले. 1960 नंतरच्या मराठी साहित्य प्रवाहामध्ये ग्रामीण साहित्याने स्वतःचे अस्तित्व सिध्द केले, याचे श्रेय ग्रामीण साहित्य चळवळीला द्यावे लागते. त्यादृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

**ग्रामीण साहित्याच्या चळवळीची पार्श्वभूमीः–**

मराठी साहित्याच्या क्षेत्रात तसेच महाराष्ट्राच्या वातावरणात 1970 च्या आसपास बदल होऊ लागला. त्याचे पडसाद साहित्यातही उमटू लागले. तसे पाहता महात्मा फुले यांच्या काळापासून ग्रामीण साहित्य लिहिले जात होते. 1920 नंतरच्या ग्रामीण साहित्याची नावीन्याचा भाग म्हणून का होईना दखल घेतली गेली. त्यावेळच्या साहित्यामध्ये घराण्याचा अभिनिवेश होता. माझे घराणे, त्याची प्रतिष्ठा जपली गेली पाहिजे असे प्रश्न होते. आज भाकरीचा प्रश्न महत्वाचा आहे. एकीकडे ना.सी.फडके रंजनवादी कादंबऱ्या लिहित होते. अशा वेळेला र.वा.दिघे, ग.ल.ठोकळ सारखे लेखकही लिहित राहिले. सराई, पाणगळ यातून ग्रामीण जीवनातील सरंजामशाही, ठाकर समाजाचे वास्तव रंगवले आहे. मराठी साहित्यासाठी हे नवे वळण होते.

1970 नंतर ग्रामीण साहित्याच्या चळवळीची भाषा सुरू झाली. यापूर्वीचे ग्रामीण साहित्य आणि इतर साहित्याचे स्वरूप व प्रेरणा यामध्ये फारसे अंतर नव्हतेच. फडके, माडखोलकर यांच्या प्रेरणा रंजनवादी होत्या तर दिघे, ठोकळ यांच्या साहित्याचे स्वरूपही रंजनपरच होते. यातून साहित्यविषयक एक

अभिरूची प्रस्थापित झाली होती आणि ग्रामीण साहित्य चळवळ या अभिरूचीला छेद देत होती. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात जन्माला आलेली नवी पिढी लिहू वाचू लागली होती. या पिढीला आपल्या अवतीभोवतीचे ग्रामीण वास्तव साहित्यात दिसत नव्हते. या काळातील लेखकाला आपण अनुभवलेल्या ग्रामीण वास्तवाला अभिव्यक्त करावे असे वाटू लागले. साहित्य चळवळीचा आणि समाजजीवनातील परिवर्तनाचा काहीएक संबंध असतो. किंबहुना असा संबंध असेल तर अशा चळवळी अर्थपूर्ण होतात. वारकरी चळवळ आजतागायत टिकून आहे. लघुअनियतकालिकाची चळवळ मात्र कोलमडून पडली. 1971 ते 74 या काळात संपूर्ण महाराष्ट्र दुष्काळात होरपळून निघाला होता. त्यामुळे ग्रामीण भागातील नव्याने शिकलेली पिढी अधिक अंतर्मुख होऊन विचार करू लागली. ज्या कृषिव्यवस्थेचा गौरव केला जातो, त्याचे धिंडवडे तो उघडया डोळयांनी पाहत होता. हे एक तात्कालिक कारण होते आणि या निमित्ताने नव्या पिढितील लेखक जागरूक झाला होता.

महाराष्ट्रात ग्रामीण भागात दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक प्रश्न निर्माण झाले होते. वाढत्या औद्योगिकीकरणाचा परिणामही दिसू लागला होता. सुशिक्षित बेकारांचा प्रश्न आदि अनेक प्रश्नांमुळे ग्रामीण समाज ढवळून निघत होता. याचाही परिणाम या चळवळीमागे आहे, कारण ग्रामीण जीवनातील प्रश्नांचे प्रतिबिंब साहित्यातून दिसून येत नव्हते. दुष्काळ हे या चळवळीचे तात्कालिक कारण म्हणता येईल. त्याचबरोबर आणखी एक कारण म्हणजे शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेचे आंदोलन. हे आंदोलन शेतमालाला योग्य भाव मिळावा यासाठी 1972—73 नंतर उभे राहिले. या लढ्यामुळे ग्रामीण भागात एक जागृती निर्माण झाली, हे आंदोलनही या चळवळीमागे आहे.

**ग्रामीण साहित्याची चळवळ आणि ग्रामीण साहित्य :—**

ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली आणि ग्रामीण साहित्यिक आत्मभान येऊन लिहू लागला, ग्रामीण जीवनाकडे पाहू लागला. खेडी, खेड्यातील निसर्ग, अनेक प्रकारचे प्रश्न, कृषीजीवन, अभावाचे जगणे ग्रामीण साहित्यातून मांडण्याचा प्रयत्न होऊ लागला. या चळवळीमुळे साहित्यातून ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण होऊ लागले. या चळवळीमुळे महात्मा फुले यांच्या विचारांशी, त्यांच्या साहित्याशी नाते जोडले गेले. तर ग्रामीण साहित्याची प्रेरणा महात्मा फुले हेच आहेत असेही काहीजण म्हणू लागले. डॉ. आनंद यादव म्हणतात, "ग्रामीण साहित्याची चळवळ ही महात्मा फुल्यांच्या मानवतावादाचा, शूद्रातिशूद्रावर व स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचा व त्यांच्या विकासाचा, छोटे शेतकरी व खंडकरी, कुळे, कुणबी, शेतमजुर, खेड्यातून नागर विभागात पोटार्थी म्हणून आलेले.... मजूर, कामगार, दलित यांच्या होणाऱ्या शोषणाचा वारसा सांगते."[1] डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म.गांधी, कर्मवीर शिंदे यांचे विचारही ग्रामीण साहित्य चळवळीचे अधिष्ठाण होते, असे म्हणता येईल. डॉ.वासुदेव मुलाटे म्हणतात, "म.फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मार्क्स यांच्या तत्वज्ञानाचा समन्वय साधून संपूर्ण समाजाची पुनर्मांडणी ग्रामीण साहित्य चळवळ करू इच्छिते..."[2] ग.ल.ठोकळ यांनी 'गावगुंड' ही कादंबरी लिहिली, त्यांनी ग्रामीण जीवन रेखाटले परंतु त्यांच्या साहित्यामध्ये ग्रामीण जीवनाचे वास्तववादी संदर्भ सापडत नाहीत. श्री.म.माटे यांनी दलितांवर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण केले, 1940 चा तो काळ. दुसऱ्या बाजूला ग्रामीण साहित्यामध्ये बी. रघुनाथ यांनीही मोठे योगदान दिले. हे साहित्य करमणुकीसाठी नाही तर जीवनाकडे वळले आहे. व्यंकटेश माडगुळकर, शंकर पाटील, अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात यांनीही वास्तव जीवन साहित्यातून मांडले.

भारत स्वतंत्र झाला आणि गावगाडा मोडला गेला. गावगाडयामध्ये जातीनिहाय व्यवस्था होती. प्रत्येक समाजगटाचा माणूस वेगळा असून वेगळा नव्हता. त्याच्यामध्ये एकीची भावना होती. गावात प्रसंग, उत्सवाच्या निमित्ताने लोक एकत्र येत असत. आज परिस्थिती बदलली आहे. आज साहित्याचा नायकही बदलला आहे. तो कष्टकरी झाला आहे. हा बदल 1945 नंतर झालेला दिसतो. 1960–70 च्या सुमारास साहित्याने कात टाकली. नवी पिढी नव्या दृष्टीने जीवनाकडे बघायला लागली. शिक्षणाचा प्रसार खेड्यापाड्यापर्यंत झाला. जो वर्ग शाळेत जात नव्हता, तोही शाळेत जायला लागला. दळणवळणाच्या माध्यमाद्वारे खेडी शहराला जोडली गेली. स्वातंत्र्य मिळाले असले तरी अनेक प्रश्न अजून सुटले नाहीत याची जाणीव लेखकाला झाली. रा.रं. बोराडे यांनी ‘पाचोळा’ तून खेड्यातला एक घटक कसा उद्ध्वस्त होतोय त्याचे चित्रण केले. ‘धग’ या कादंबरीतून उद्धव शेळके यांनी कष्टकरी वर्गातील स्त्रीचे दुःख मांडले. धरणग्रस्तांचे प्रश्न कादंबरीतून यायला लागले. सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न, पाण्याचा प्रश्न साहित्याचे विषय झाले. नागनाथ कात्तापल्ले यांची गांधारी, बाबाराव मुसळे यांची हाल्या हाल्या दुधू दे,वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळया यांसारख्या कादंबऱ्यांतून प्रत्यक्षात काय चालले आहे, त्याचे चित्रण यायला लागले. ग्रामीण भागात विकास तर झाला नाहीच, शेतकऱ्यांच्या आत्महत्या मात्र घडायला लागल्या. त्याचे चित्रण साहित्यातून यायला लागले. सदानंद देशमुखांच्या ‘बारोमास’ मधून राजन गवस यांच्या ‘तणकट’ मधून ग्रामीण तरुणमनाच्या व्यथा मांडल्या आहेत, सवर्ण–दलित संघर्ष मांडला आहे.

ग्रामीण लेखकांनी ग्रामीण जीवनाचे चित्रण केले, त्याचबरोबर त्यांनी ग्रामीण जीवनाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण साहित्य चळवळीचा परिणाम या चळवळीपासून दूर असलेल्या लेखकांवरही झालेला दिसतो. आज लिहिणारे ग्रामीण लेखक समाजाच्या वेगवेगळ्या स्तरातून आलेले दिसतात. भास्कर चंदनशिव, वासुदेव मुलाटे, इंद्रजित भालेराव, श्रीकांत देशमुख, विठ्ठल वाघ, बाबाराव मुसळे, नामदेव कांबळे, सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, रवींद्र शोभणे, शेषराव मोहिते, तानाजी राऊ पाटील असे कितीतरी ग्रामीण लेखक व कवी आज ग्रामीण वास्तव जीवनचित्रण करताना दिसतात.

विश्वास पाटिल यांची ‘पांगिरा’, सदानंद देशमुख यांच्या ‘तहान’ यासारख्या ग्रामीण कादंबऱ्यांतून धरणग्रस्त, पाणी यासारखे ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेले प्रश्न मांडण्यात आले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेने ग्रामीण जीवनाची जी वाताहत झाली, त्याचे चित्रण बस्तान, लिंगाड, खांदेपालट, वारूळ, जांभुळडव्ह, पीकपाणी यासारख्या अनेक साहित्यकृतीतून यायला लागले. दूर राहिला गाव, कुळंबिणीची कहाणी हे भालेराव यांचे काव्यसंग्रह थेट म.फुले व विठ्ठल रामजी शिंदे यांच्याशी नाते जोडताना दिसतात. तर कल्पना दुधाळ यांचा सीझर कर म्हणतेय माती हा काव्यसंग्रह सुध्दा विचारप्रवण आहे. ग्रामीण कथेचा विचार करता, तिच्यामध्ये दलित कथाही अंतर्भूत होते. कारण ती वेशीच्या आतील तसेच बाहेरील जीवनाचे चित्रण करणारी आहे. दोन्ही ठिकाणचे जीवन हे शेवटी गावगाड्यातील जीवन आहे. योगीराज वाघमारे यांच्या बहुतेक कथा या एका अर्थाने ग्रामीणच आहेत. ‘जेव्हा मी जात चोरली होती’ या बाबुराव बागूल यांच्या कथासंग्रहातही ग्रामीण जीवनानुभवच मांडले आहेत. ग्रामीण साहित्य चळवळीमुळेच ग्रामीण साहित्य कादंबरी, कथा, कविता आदी साहित्य प्रकाराद्वारे अधिक वस्तुस्थितीपूर्ण चित्रण करू लागले आहे. ग्रामीण साहित्य चळवळीचा हा परिणाम आहे. अजूनही ग्रामीण साहित्याला आपल्या अनुभवविश्वाचे, समाजवास्तवाचे प्रभावपूर्ण चित्रण करावे लागेल. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते, ‘‘एकूण व्यवस्था उद्ध्वस्त करण्याची आणि नवी समताधिष्ठित समाजरचना उभारण्याची जाणीव ग्रामीण साहित्यात कमी प्रमाणात आहे., यात शंका नाही. ग्रामीण साहित्य अजूनही मध्यमवर्गीय

PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES Vol 1, Issue 2

संवेदनशीलतेपासून संपूर्णतः मुक्त होत नाही. मराठीतील आधीच्या ग्रामीण साहित्याच्या संस्कारापासून ग्रामीण साहित्याला संपूर्णतः मुक्त होईपर्यंत स्वतःची वेगळी शब्दकळा सापडणार नाही. ग्रामीण साहित्याला हे जाणीवपूर्वक करावे लागेल. हे जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ग्रामीण साहित्याची चळवळ सुदृढ होणार नाही."[3] ग्रामीण भागामध्ये असणारे अनेक प्रश्न साहित्यातून प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. त्याचे सामर्थ्य ग्रामीण जीवनामध्ये बदलाच्या स्वरूपात दिसायला हवे.

**समारोप :–**

ग्रामीण साहित्य चळवळीमुळे ग्रामीण साहित्याला एक दिशा मिळाली. हे साहित्य ज्या अनुभवविश्वाचे, समाजवास्तवाचे चित्रण करते, ते समाजवास्तव मध्यमवर्गीय साहित्यापेक्षा वेगळे आहे. ग्रामीण जीवनाचे बदलते स्वरूप, शासन, सहकार, जागतिकीकरण, राजकारण आदींच्या प्रभावाने निर्माण झालेले अनेक प्रश्न, ढासळलेली अर्थव्यवस्था, विषमता, भौतिक सुखाचा अभाव, निसर्गाचा अनियमितपणा, बदल त्यामुळे त्याचे शेतीव्यवसायावर झालेले दूरगामी परिणाम याचे दर्शन ग्रामीण साहित्यातून घडायला लागले. 1970 नंतरच्या ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण नवलेखकाला अंतर्मुख बनविले. या चळवळीमुळे कथा, कादंबरी, कविता, नाटक, ललित गद्य, समीक्षा अशा साहित्य-प्रकारात लेखन करण्यास लेखकाला प्रवृत्त केले. आणि ग्रामीण साहित्य प्रवाह नावारूपाला आला. बनगरवाडी, धग, पाचोळा, चारापाणी, गोतावळा, तहान, बारोमास, हाल्या हाल्या दुधू दे, पखाल, पांगिरा, झाडाझडती, गांधारीचे डोळे, तणकट यांसारख्या कादंबऱ्यातून, तर नातीगोती, बोळवण, कडबा आणि माणसे, डवरणी, उखडलेली झाडे, जांभुळडव्ह, मरणकळा, नवी वारूळ या कथासंग्रहाद्वारे शेतकऱ्यांच्या जीवनातील, ग्रामीण भागातील समस्या व्यक्त व्हायला लागल्या. यामध्ये ग्रामीण साहित्य चळवळीचे योगदान मोठे आहे. ग्रामीण साहित्य म्हणजे शेतकरी साहित्य असा एक समज आहे. ग्रामीण साहित्याने आपला परिघ वाढवला पाहिजे. पाथरवट, वासुदेव, पिंगळा, घिसडी, ठाकर, गोंड यांच्या साहित्याचाही समावेश ग्रामीण साहित्यामध्ये व्हायला हवा. ग्रामीण साहित्याची चळवळ गतीमान होण्यासाठी ग्रामीण साहित्याने अधिक जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत.

## संदर्भ – टिपा :–

1. गणेश देशमुख, मराठी ग्रामीण साहित्य : विचार आणि चळवळ, आमची श्रीवाणी, पृ.क्र.68
2. डॉ.वासुदेव मुलाटे, नवे साहित्य : नवे आकलन, पृ.क्र.35
3. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ग्रामीण साहित्यः स्वरूप आणि शोध, पृ.क्र.146–147.